**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १५.५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२ / सातारा | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ. सतिश मधुकरराव कदम<br>मु.पो.मल्हारपेठ, (नारळवाडी), ता.पाटण, जि.सातारा | प्रतिनिधी हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मल्हारपेठ, ता. पाटण, जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटण, ता. पाटण, जि. सातारा | हजर |

अपीलकर्त्याने मूळ मागणी अर्जामध्ये बोजा असलेल्या मिळकतीबाबत हस्तांतराची जी कार्यवाही झालेली आहे त्याबाबतची माहिती मागितली होती.

अपीलकर्ते मयत झालेले असल्याने प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेल्या अपीलकर्त्यांच्या आई सौ. सुमन मधुकर कदम, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यामध्ये झालेल्या चर्चेत मागणी केलेली माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्यास संमती देण्यात आली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २७.६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १५.५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२ / सातारा | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ. सतिश मधुकरराव कदम<br>मु.पो.मल्हारपेठ, (नारळवाडी), ता.पाटण, जि.सातारा | प्रतिनिधी हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मल्हारपेठ, ता. पाटण, जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटण, ता. पाटण, जि. सातारा | हजर |

अपीलकर्त्याने मूळ मागणी अर्जामध्ये बोजा असलेल्या मिळकतीबाबत हस्तांतराची जी कार्यवाही झालेली आहे त्याबाबतची माहिती मागितली होती.

अपीलकर्ते मयत झालेले असल्याने प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेल्या अपीलकर्त्याच्या आई सौ. सुमन मधुकर कदम, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यामध्ये झालेल्या चर्चेत मागणी केलेली माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्यास संमती देण्यात आली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.६.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिलीप अशोक देसाई<br>ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, नागाळा पार्क,<br>जिल्हा परिषद कार्यालयासमोर, कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर, जि. कोल्हापूर - ४१६ ००३ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर, जि. कोल्हापूर -४१६००३ | हजर |

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर डॉ. य.बा.सोनटक्के यांच्याविरूध्द भ्रष्टाचार व गैरकारभाराविषयी केलेल्या तक्रार अर्जाबाबत अपीलकर्ता श्री. दिलीप अशोक देसाई यांनी माहिती मागितलेली होती. याबाबत कार्यवाही चालू असून ती पूर्ण झाल्यावर माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकाऱ्यानी त्यांना कळविले. तसेच उपलब्ध इतर माहिती दिली. कार्यवाही पूर्ण झाल्यावर तो तपशील जन माहिती अधिकारी श्री. अ.अ. मोकाशी यांनी दि. ११.१०.२००७ च्या पत्रान्वये सादर केला. ऊर्वरित माहिती उपलब्ध करून देण्याचे तीनही घटकांमधील चर्चेत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. त्यानुसार अपीलकर्त्याने अपील निकाली काढण्यास मान्यता दिली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याला द्यावयाची राहिलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी चर्चेत मान्य केल्याप्रमाणे उपलब्ध करून द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. ३०.६.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

प्रा. रमेश केशवराव वानखडे
ओ-१३/३०३, प्लॅनेट मिलेनियम,
पिंपळे सौदागर, पुणे-४११ ०२७

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सचिव, खडकी शिक्षण संस्था
४९१, एलफिस्टन रोड, खडकी, पुणे-३

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
प्राचार्य, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय,
४९१, एलफिस्टन रोड, खडकी, पुणे-३

| | | |
|---|---|---|
| १ | सुनावणीची तारीख | दि. १७.१.२००८ |

२ उपस्थित

**अपीलकर्ता** प्रा. रमेश केशवराव वानखडे
ओ-१३/३०३, प्लॅनेट मिलेनियम,
पिंपळे सौदागर, पुणे-४११ ०२७

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय,
४९१, एलफिस्टन रोड, खडकी, पुणे-३

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ११२/ पुणे | दि. ७.३.२००६ | दि. ४.७.२००६ | दि.२४.७.२००६ | दि. -- |
| १३१ / पुणे | दि. २९.३.२००६ | दि. -- | दि. ९.५.२००६ | दि. -- |
| १३२ / पुणे | दि. २५.३.२००६ | दि. -- | दि. ९.५.२००६ | दि. -- |
| १३३ / पुणे | दि. १४.३.२००६ | दि. -- | दि. ९.५.२००६ | दि. -- |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र. ११२ / पुणे**

दि. ५.८.१९९६ ते दि. २४.१२.१९९६ या काळातील पगार दीड वर्षानंतर दि. १५ जून १९९८ रोजी इतक्या प्रदीर्घ उशिरा का दिला, पगाराची रक्कम रू. २३,४९८/- तब्बल दीड वर्ष का वापरली, १८ टक्केने दीड वर्षाचे व्याज अद्याप का दिले नाही.

**अपील क्र. १३१ / पुणे**

सेवापुस्तकातील दि. ५.८.१९९६ च्या नोंदीची खाडाखोड का केली, दि. १५.२.२००२ च्या पत्राचा अद्यापपर्यंत खुलासा का दिला नाही, सेवापुस्तकाची सांक्षाकित प्रत अद्याप का दिली नाही.

**अपील क्र. १३२ / पुणे**

सन १९९६ चे नियुक्तीपत्र साडेपाच वर्षानंतर-म्हणजे दि. ४.५.२००२ रोजी इतक्या प्रदीर्घ विलंबाने का दिले, कोणत्या नियमाच्या आधारे साडेपाच वर्षे विलंब लागला, विनंती अर्ज करूनही साडेपाच वर्षापर्यंत नियुक्तीपत्र का दिले नाही, साडेपाच वर्षांपर्यंत केलेल्या अन्यायाची नेमकी कारणे कोणती, कॉलेजचे प्रशासन कोणत्या नियमांच्या आधारे चालते, साडेपाच वर्षापर्यंत एकूण झालेल्या छळवणुकीला जबाबदार कोण.

**अपील क्र. १३३ / पुणे**

दि. १३.९.२००४ च्या आदेशाची अद्याप अंमलबजावणी का केली नाही, गेल्या अडीच वर्षात त्यासंबंधी काय कार्यवाही केली, दि. ५.३.२००५ च्या तनिसच्या बैठकीत आपण दिलेल्या लेखी आश्वासनांची पूर्तता का केली नाही, नोकरीतील सेवासंबंधीच्या सर्व प्रकारच्या तांत्रिक व आर्थिक अडचणीला जबाबदार का धरू नये.

## विवेचन

प्रा. रमेश केशवराव वानखडे यांनी खडकी शिक्षण संस्थेच्या टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयातील आपली नेमणूक, पुणे विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी, सेवापुस्तिका आदि संदर्भात जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी यांच्याकडे माहिती मागणारे चार अर्ज केले होते. जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती न मिळाल्यामुळे प्रा. वानखडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, खडकी शिक्षण संस्था, खडकी, पुणे यांच्याकडे अपिले केली.

प्रा. वानखडे यांनी दि. १४.३.२००६ रोजी (अपील क्र. १३३), दि. २५.३. २००६ रोजी (अपील क्र. १३२), दि. २९.३.२००६ रोजी (अपील क्र. १३१), व दि. ७.३.२००६ रोजी (अपील क्र. ११२) जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केले होते. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, खडकी शिक्षण संस्था, पुणे यांनी दखल न घेतल्यामुळे प्रा. वानखडे यांनी शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे यांच्याकडे दाद मागितली होती. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये, अशासकीय महाविद्यालयाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे अपिले करू शकता, असे शिक्षण सहसंचालकांनी प्रा.वानखडे यांना कळविले. त्यानुसार प्रा. वानखडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत. आयोगाने दि. १७.१.२००८ रोजी सुनावणी निश्चित केली, त्यानंतर जन माहिती अधिकारी डॉ. मुकुंद तापकीर यांची मुदतवाढीची विनंती मान्य करून दि. २१.५.२००८ रोजी सुनावणी घेतली.

खडकी शिक्षण संस्था व प्रा. वानखडे यांच्यात गेल्या काही वर्षांपासून वाद सुरू असून त्याची पार्श्वभूमी या अपिलांना आहे.

आपण दि. ५.८.१९९६ रोजी संस्थेच्या सेवेत दाखल झालो. पुरेसा कार्यभार नसल्याचे खोटे कारण दाखवून दि. २५.१२.१९९६ रोजी आपल्याला कमी केले. या संदर्भात प्रकरण उच्च न्यायालयात दाखल असून त्यासाठी आपण ही माहिती मागत आहोत, असे प्रा. वानखडे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. सेवापुस्तकाची प्रत आपण मागितली होती, परंतु ती आपल्याला दिली गेली नाही, असे प्रा. वानखडे यांनी नमूद केले. प्रा. वानखडे यांनी सेवापुस्तकाबाबत पोलिसांकडे तक्रार केली होती, तसेच पुणे विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडेही तक्रार दाखल केली होती. तक्रार

निवारण समितीत आपल्या बाजूने निकाल लागूनही महाविद्यालयाने त्या आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केला होता. त्यावर तक्रार निवारण समितीने महाविद्यालयाच्या प्रशासनाला समज दिली होती. त्यानंतर आपल्याला सेवापुस्तक दिले गेले, असे प्रा. वानखडे यांनी नमूद केले. या विषयाबाबत संस्थेने उच्च न्यायालयात दावा दाखल केला असून त्याचा निर्णय प्रतिक्षाधीन आहे, असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य डॉ. मुकुंद म. तापकीर यांनी सांगितले.

वादाच्या विषयासंबंधीच्या काळात आपण प्राचार्य पदी नव्हतो तसेच प्रा. वानखडे यांच्या संबंधीची सर्व कागदपत्रे महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक श्री. राजू महादेव लंघे यांच्याकडे होती. श्री. लंघे यांचे दि. ४.१०.२००७ रोजी निधन झाले, त्यामुळे संबंधित कागदपत्रांचा त्यांच्या कार्यालयातून आपण शोध घेत आहोत, असे प्राचार्य डॉ. मुकुंद तापकीर यांनी नमूद केले व आपली बाजू मांडण्यास मुदतवाढीची विनंती केली. प्रा. वानखडे वेगवेगळ्या प्रकारचे अर्ज विविध मंचाकडे करीत असतात, असे नमूद करून प्राचार्यांनी त्याबाबतचा तपशील सादर केला.

प्रा. वानखडे यांनी चारही अपिलामध्ये मागितलेली माहिती ही खुलासा अथवा भाष्य मागणारी आहे. उदा. सेवापुस्तकात खाडाखोड का केली, दि. १५.२.२००० च्या पत्रांचा अद्यापपर्यंत लेखी खुलासा का दिला नाही, माझ्या नोकरीतील सेवासंबंधीच्या सर्व प्रकारच्या तांत्रिक व आर्थिक अडचणीला आपणास (प्राचार्याला ) का जबाबदार धरू नये ? आपल्याकडून साडेपाच वर्षांपर्यंत माझ्या एकूण झालेल्या छळवणुकीला जबाबदार कोण ? अशा स्वरूपाचे प्रश्न 'माहिती' म्हणून विचारले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येनुसार अशा प्रकारे खुलासा, स्पष्टीकरण, भाष्य करणे या स्वरूपाची विचारणा करता येणार नाही. मात्र जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रा. वानखडे यांना अपेक्षित असणारी व 'माहिती' या व्याख्येत बसणारी माहिती देणे आवश्यक आहे. कार्यालयीन अधीक्षक श्री. लंघे यांचे निधन झाल्याचे प्राचार्यांनी नमूद केले आहे. मात्र प्रा. वानखडे यांनी माहिती मार्च २००६ मध्ये मागितली आहे व श्री. लंघे यांचे निधन ऑक्टोबर २००७ मध्ये झालेले आहे. माहिती देण्याबाबत सकारात्मक भूमिका ठेवून दरम्यानच्या काळात प्राचार्य माहिती देऊ शकले असते.

अपीलकर्त्यास अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणीसाठी बोलावले, त्यावेळी ते आले नाहीत, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांतून दिसते. त्यांनी उपस्थित राहणे अथवा आपले निवेदन सादर करणे आवश्यक होते व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, खडकी शिक्षण संस्था, पुणे श्री. चंद्रकांत छाजेड यांनी अपिलांची दखल घेऊन निर्णय देणे आवश्यक होते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपिले अमान्य.

२. आपल्याला हवे असलेल्या व 'माहिती' च्या व्याखेत रास्त ठरणाऱ्या मुद्दयांची चारही अपिलातील सर्वसमावेशक यादी अपीलकर्ता प्रा. वानखडे यांनी जन माहिती अधिकारी यांना सादर करावी व ही यादी सादर केल्यापासून आठ दिवसात जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याबाबतचा पूर्तता अहवाल हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी, पुणे यांनी आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.६.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर ,३१ अंजली, कॉलनी, गेंडामाळ, शाहुपरी, जि.सातारा -४१५ ००२ |
| ३ | जन माहिती अधिकारी | व्यवस्थापक,शासकीय दूध योजना सातारा,जि.सातारा |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कॉमन वेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे -३० |

शासकीय दुग्धशाळा, सातारा हे युनिट बंद करुन तेथील कर्मचा-यांची अन्यत्र बदली करण्याबाबतचा प्रस्ताव दुग्धशाळा व्यवस्थापक यांनी आयुक्त कार्यालय व अन्य वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यासंबंधातील प्रस्तावाची प्रत व तदनुषंगिक इतर माहिती अपीलकर्त्याने मागितली होती.

याबाबत वरील तीनही घटकांत झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्यास माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढण्यास अपीलकर्त्याने अनुमती दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ४.०६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत कृष्णा जाधव
५२/जेसीओ हौसिंग सोसायटी,
सैनिक नगर, सदरबाझार, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत अपशिंगे(मि), ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२ / सातारा / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शशिकांत कृष्णा जाधव
५२/जेसीओ हौसिंग सोसायटी,
सैनिक नगर, सदरबाझार, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, सातारा श्री.विश्वास शिवराम सिद

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत अपशिंगे(मि), ता.जि.सातारा श्री.मधुकर आनंदराव चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>घर मिळकत क्र.८७० च्या मूळ अर्जाची व संडास नोंदीबाबत, तसेच शेतजमिनीतील घराची पोकळ नोंद रद्द केल्याबाबत. | |

## विवेचन

शेतजमिनीतील घराची पोकळ नोंद रद्द करण्याच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.शशिकांत कृष्णा जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत अपशिंगे, ता.जि.सातारा यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर व माहिती विहित मुदतीत दिली, परंतु मागितलेल्या कागदपत्रांच्या सहीशिक्क्यासह प्रती दिल्या नाहीत, म्हणून श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांच्याकडे अपील केले. श्री.जाधव यांनी केलेल्या मूळ अर्जावर मुद्रांक शुल्क लावलेले नव्हते. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याची दखल न घेण्याबाबत हे कारण श्री.जाधव यांना कळविणे आवश्यक होते, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आपल्या निकालपत्रात नमूद केले आहे. मूळ अर्जाची, तसेच संडास नोंदीची प्रत व श्री.जाधव यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या सात कागदपत्रांच्या प्रती सहीशिक्क्यासह पाच दिवसात श्री.जाधव यांना द्याव्यात, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानंतरही आपल्याला माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.जाधव यांची मूळ मागणी पोकळ नोंदी रद्द करण्याची आहे. हा विषय गेली सहा वर्षे विविध पातळ्यांवर ते सातत्याने मांडत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खालीही त्यांनी त्यासाठी अनेक अर्ज केले आहेत.

श्री.जाधव यांनी दि.२४.२.२००६ अन्वये माहिती मागणीसाठी अर्ज केला. आपण दि.२८.२.२००६ रोजी व्ही.पी.ने त्यांना माहिती पाठविली होती. त्यानंतरही श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी यांच्याकडे अपील केले. त्यांनी दिलेल्या आदेशानुसार दि.१७.४.२००६ रोजी समक्ष कागदपत्रे दिली असून त्याची पोहोच घेतलेली आहे. समक्ष माहिती देऊनही माहिती न मिळाल्याबाबत त्यांनी खोटे अपील केले आहे. त्याबाबतची सर्व कागदपत्रे पुन्हा आयोगासमोर संबंधितांना देण्यास तयार आहे, असे ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, अपशिंगे श्री.मधुकर आनंदराव चव्हाण यांनी दि.१६.१०.२००७ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. परंतु आपल्याला अशी माहिती देण्यात आलेली नसून जन माहिती अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाचेही त्यांनी पालन केलेले नाही , त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी श्री.जाधव यांनी केली.

'गट क्र.१४४८ मधील ७/१२ ला असलेल्या नोंदी आपल्या वडिलांच्या संमतीने म्हणजे ते ग्रामपंचायत सदस्य असतानाच झालेल्या आहेत. २४ वर्षात असलेल्या वहिवाटीच्या नोंदीत कोणत्याही प्रकारचा फेरबदल करण्यास ग्रामपंचायत तयार नाही' असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), सातारा जिल्हा परिषद, सातारा यांनी श्री.जाधव यांना लोकशाही दिनी केलेल्या अर्जाच्या संदर्भात दि.२७.७.२००७ रोजी कळविले आहे.

नोंद रद्द करणे - न करणे हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. मात्र श्री.जाधव यांनी मागितलेली माहिती त्यांना दिली जाणे आवश्यक होते व ती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत अपशिंगे श्री.मधुकर आनंदराव चव्हाण यांनी टाळाटाळीची भूमिका घेतलेली आहे, असे श्री.जाधव यांना त्यांनी पाठविलेली पत्रे व आयोगाला सादर केलेली निवेदने यातून स्पष्ट होते.

गटनोंद, संडासनोंद यासह अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशात नमूद केलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती श्री.जाधव यांना देण्याचा आदेश आयोगाने दि.२४.१०.२००७ रोजी सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याची पूर्तता करण्याची जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी

श्री.मधुकर आनंदराव चव्हाण यांची जबाबदारी होती. परंतु त्यांनतरही संबंधित प्रती मिळाल्या नसल्याचे श्री.जाधव यांनी दि.३१.१२.२००७ च्या पत्रान्वये आयोगाच्या निदर्शनास आणले. त्यानंतर आयोगाने विचारणा केली असता ग्रामविकास अधिकारी श्री.मधुकर आनंदराव चव्हाण यांनी उत्तर न देता गटविकास अधिकारी श्री.विश्वास शिवराम सिद यांनी उत्तर पाठविले. श्री.चव्हाण यांनी दि.२६.१०.२००७ रोजी काही माहिती श्री.जाधव यांना पाठविली होती. घराच्या नोंदीसंबंधातील अर्ज मासिक बैठकीत ठेऊन सदरच्या नोंदीची पूर्तता झाल्यानंतर ते अर्ज पाच वर्षापर्यंत ग्रामपंचायत दप्तरी ठेवले जातात तदनंतर सदरचे अर्ज नाश केले जातात. त्यानुसार घर मिळकत क्र.८७० चा मूळ अर्ज व संडास नोंद मुदत संपल्याने नाश करण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे', असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.विश्वास शिवराम सिद यांनी दि.१९.३.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. नष्ट केलेली माहिती ही प्रचलीत अभिलेख नियमानुसार योग्य कालावधीत नष्ट केली आहे, असे गटविकास अधिकारी यांनी आयोगाने पुन्हा केलेल्या विचारणेनंतर दि.१३.५.२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

श्री.जाधव यांचा मूळ अर्ज दि.२३.१.२००६ चा आहे. त्यावर मुद्रांक शुल्क नसल्यामुळे उत्तर न दिल्याचे जन माहिती अधिकारी श्री.मधुकर आनंदराव चव्हाण यांचे म्हणणे आहे. त्यानंतर श्री.जाधव यांनी दि.२४.१.२००६ रोजी केलेल्या अर्जावर श्री.चव्हाण यांनी दि.२५.४.२००६ रोजी उत्तर दिले आहे. श्री.चव्हाण यांनी आयोगाला दि.१४.१०.२००७ रोजी सादर केलेल्या निवेदनात श्री.जाधव यांचा मूळ अर्ज दि.२४.२.२००६ चा असल्याचे नमूद केले आहे. व्ही.पी.ची पावती त्यांनी सादर केली असली तरी मागितलेली सर्व कागदपत्रे दिलेली नाहीत, हे श्री.जाधव यांनी दिलेल्या पाहोचपत्रावरुन दिसून येते. मूळ अर्ज व संडास नोंद यांबाबतची कागदपत्रे नष्ट करण्यात आल्याचे श्री.चव्हाण यांनी अथवा गटविकास अधिकारी श्री.सिद यांनी दि.२४.१०.२००७ रोजी आयोगापुढील सुनावणीत सांगितले नव्हते. तसेच ही कागदपत्रे कोणत्या तारखेची होती व केव्हा नष्ट केली, हेही कोणत्याच पत्रात स्पष्ट केलेले नाही. तसेच आयोगाने विचारणा केल्यानंतर संबंधित मुद्दयांचा खुलासाही जन माहिती अधिकाऱ्यांऐवजी अपिलीय प्राधिकारी यांनी केला आहे. याबद्दल आयोग तीव्र नापसंती नोंदवून संबंधितांना कडक ताकीद देत आहे. माहिती देण्याबाबतची

श्री.चव्हाण यांची नकारात्मक भूमिकाही या साऱ्यातून दिसून येते. माहिती नाकारण्याचाच हा प्रकार असून त्याबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत अपशिंगे श्री.मधुकर आनंदराव चव्हाण यांनी माहिती देण्याबाबत टाळाटाळ करण्याची भूमिका घेतलेली आहे. नष्ट करण्यात आलेल्या कागदपत्रांबाबत संपूर्ण तारीखवार खुलासा त्यांनी हे आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा. त्यानंतर शास्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.११.६.२००८**

july-०८-२२२४

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१ / सांगली | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील<br>शितल, दामाणी हायस्कूलचे पूर्वेस, चांदणी चौक,<br>जि. सांगली - ४१६ ४१६ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | हजर |

अपीलकर्त्याने बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स अभ्यासक्रमाविषयी एकूण तीन मुद्दयांची माहिती मागितली आहे. दि. १३.११.२००६ रोजी माहिती विनाशुल्क देण्यात आली आहे, असे सहाय्यक जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. अपीलकर्त्याने माहिती प्राप्त झाल्याचे मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २४.५.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**